# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

3, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक 1967, मुंबई 400 001.

दूरध्वनी § 22620601,22690602,22641150,22641151 फॅक्स -2269 2102/2269007.

desk२a@dte.org.in Internet: http://www.dtemaharashtra.gov.in


कार्यालयीन आदेश

क्रमांक: २अ/एडीएम/२०१६/ ८३६

दिनांक : 24 JUN 2016

महाराष्ट्र विनाअनुदानीत खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम, २०१५ , दिनांक १७.८.२०१५ नुसार महाराष्ट्र राज्यातील विनाअनुदानित खाजगी व्यावसायीक शैक्षणिक संस्थामधील प्रवेशाचे व शुल्काचे विनियमन करण्यासाठी आणि त्याच्याशी संबंधित तदनुषंगिक बाबीसाठी " प्रवेश नियामक प्राधिकरण " आणि " शुल्क नियामक प्राधिकरण " या दोन प्राधिकरणांची स्थापना करण्यात आलेली आहे. तसेच प्रवेश नियामक प्राधिकरणांतर्गत राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष निर्माण केलेला आहे. या अधिनियमानुसार तंत्रशिक्षणातील व्यावसायिक पदविका,पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांसाठीचे प्रवेश नियम व प्रवेश पात्रता शासनाने राजपत्राद्वारे दिनांक ११.३.२०१६ रोजी प्रसिध्द केले आहेत. शासकीय व अशासकीय अनुदानीत संस्थांमधील व्यावसायिक पदविका,पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठीसुध्दा सदर प्रवेश नियम लागू करण्याबाबत शासन निर्णय उच्च व तंत्रशिक्षण विभाग क्रमांक टीईएम-२०१६/प्र.क्र.५३६/तांशि-४,दिनांक १५.३.२०१६ निर्गमित केलेला आहे. त्यानुसार शैक्षणिक वर्ष २०१६-१७ मधील व्यावसायिक अभ्यासक्रमांचे प्रवेश होणार आहेत. त्यानुसार शैक्षणिक वर्ष २०१६-१७ मधील व्यावसायिक अभ्यासक्रमांचे प्रवेश संचालक, तंत्रशिक्षण यांचे मार्फत मा.आयुक्त, राज्य सामाईक परीक्षा कक्ष यांचे देखरेखीखाली व नियंत्रणाखाली होणार आहेत.

**शैक्षणिक वर्ष २०१६-१७ मधील प्रथम वर्ष एम .ई./एम.टेक. पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमासाठीच्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेची जबाबदारी संचालनालयाच्या वतीने डॉ.पी एच सावंत, प्राचार्य,सरदार पटेल कॉलेज ऑफ इंजिनियरींग,अंधेरी, मुंबई यांचेवर सोपविण्यात येत आहे. त्यांनी सदर अभ्यासक्रमाच्या केंद्रीभूत प्रक्रियेसंदर्भात संचालनालयाच्या वतीने काम पहावे.**

( डॉ. सुभाष महाजन )

संचालक, तंत्रशिक्षण,महाराष्ट्र राज्य,मुंबई

प्रत : माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी

१. मा.प्रधान सचिव,उच्च व तंत्रशिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ३२ यांना माहितीस्तव सादर
२. मा. आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश कक्ष, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना माहितीसाठी
३. सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,मुंबई,पुणे,नाशिक,औरंगाबाद,अमरावती, नागपूर
४. प्राचार्य, सरदार पटेल कॉलेज ऑफ इंजिनियरींग, अंधेरी,मुंबई
५. संबंधित अधिकारी
५. कार्यासन क्रमांक ३ (माहिती तंत्रज्ञान कक्ष ) मुख्य कार्यालय, मुंबई

D:\Budage\२०१६-१७\ME M.Tech\M.E.Competant Authority order.docx